दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ४ थे अंक २२७ वा रविवार दि.०२ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## देशमुख हत्या प्रकरण फास्टट्रॅकवर चालविण्याची विनंती करणार

मुंबई : प्रतिनिधी बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपपत्र दाखल झाले आहे. देशमुख हत्या प्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची आधीच नियुक्ती करण्यात आली आहे. हे प्रकरण फास्टट्रॅक चालवावे अशी विनंती न्यायालयाला करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच ड्रग्ज प्रकरणात कोणाही पोलिसाचा जर थेट संबंध आढळला तर तो कोणत्याही हुद्यावर असो त्याला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्यात येईल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र पोलिस परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याला उपस्थित राहिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकारांशी बोलत होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा पोलिसांनी अतिशय प्रोफेशनल पद्धतीने तपास केला आहे. नवीन कायदयाचा अवलंब करून वेळेत तसेच संपूर्ण पुराव्यासह आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. हे प्रकरण फास्टट्रॅक चालविण्याची विनंती न्यायालयाला करण्यात येईल असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ड्रग्जशी संबंधित पोलिस बडतर्फ होणार महाराष्ट्र पोलिस परिषद पार पडली आहे. त्यात विविध विषयांवर चर्चा झाल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जे तीन नवीन कायदे देशात तयार झाले आहेत त्याची महाराष्ट्रात कशा प्रकारे अंमलबजावणी होणार याचे सादरीकरण झाले. महासायबर प्लॅटफॉर्म तयार झाला आहे त्याचेही सादरीकरण झाले. महिला बाल अत्याचार रोखण्यासाठी तसेच या



संदर्भातील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व वेळेत आरोपपत्र दाखल कसे होईल याची चर्चा झाली. तसेच उदयोगांना कोणताही त्रास होउ नये यावरही चर्चा झाली. त्याचसोबत फॉरेन्सिक कॅपेबिलीटी वाढविता कशी येईल याचे सादरीकरण झाले. अंमलीपदार्थबाबत काय कारवाई करता येईल यावर चर्चा झाली. ड्रग्जबाबत आपण झीरो टॉलरन्स पॉलिसी अवलंबिली आहे. पोलिस मग तो कोणत्याही रँकचा असो ड्रग्ज प्रकरणाशी जर त्याचा थेट संबंध आढळला तर त्याला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्यात येईल असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. गुन्हयात जो मुददेमाल जप्त करण्यात येतो तो संबंधित मालकाला तातडीने परत करण्याचाही निर्णय घेण्यात आला असल्याचेही ते म्हणाले.

## ट्रम्पने झेलेंस्कीला झापले; शांतता कराराला तडका!

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेंस्की यांच्यात एक साधी भेट होती, मात्र त्याचे रुपांतर वादात झाले. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी या भेटीत थेट झेलेंस्की यांच्यासमोर युद्धाचा मुद्दा छेडला. या आरोपाची री ओढत ट्रम्प यांनी सांगितलं की, झेलेंस्की यांना शांतता नको आहे आणि जर त्यांना ऐकायचं नसेल तर अमेरिका या युद्धातून बाहेर पडेल. यावर झेलेंस्की यांनी उत्तर दिलं की, आम्हाला हमीसह युद्धबंदी हवी आहे. पण प्रकरण इथेच शांत होईल असं शक्य नाही. यामुळे आता नव्या युद्धाच्या बिजाची पेरणी होत असल्याचं दिसत आहे.



खरं तर दोन्ही देशाचे अध्यक्ष मौल्यवान खनिजाबाबत करार करण्यासाठी एकत्र आले होते. यासाठीच झेलेंस्की यांचा अमेरिका दौरा होता. पण दोन्ही देशात शांततापूर्ण करार होण्याऐवजी भलतंच घडलं. झेलेंस्की यांनी ट्रम्प यांना स्पष्ट शब्दात सांगितलं की, राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी शांतीवार्ता करताना कोणतीही तडजोड केली जाणार नाही. असं त्यांनी सांगताच तिथेच माशी शिंकली. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स म्हणाले की, हे युद्ध राजनैतिक पद्धतीने सोडवता येईल. असं बोलल्यानंतर वादाला फोडणी मिळाली.

ट्रम्प यांनी झेलेंस्की यांना त्यांच्या भाषेत उत्तर दिलं. ट्रम्प म्हणाले की, युक्रेन संकटात आहे. तुम्ही हे युद्ध जिंकू शकत नाहीत. पण आम्ही तुमच्यासोबत आहोत म्हणून तुम्हाला एक संधी आहे. तुम्ही यातून बाहेर येऊ शकता. आम्ही तुम्हाला ३५० अब्ज डॉलर दिले आहेत. सैन्य उपकरणं दिली. जर आम्ही तुम्हाला ही मदत केली नसती तर हे युद्ध दोन आठवड्यातच संपलं असतं.

ट्रम्प यांनी पुढे सांगितलं की, तुमच्या मनात पुतिन यांच्याबाबत तिरस्कार आहे. दुस-या बाजूनेही तुम्हाला पसंती मिळेल असं वाटत नाही. जर तुम्हाला असं वाटत असेल की, मी कणखर व्हावे असे वाटत असेल तर मी जगातील इतर कोणापेक्षाही कणखर होऊ शकतो. पण तुम्ही अशा प्रकारे कोणतीही डील करू शकत नाही. यावर झेलेंस्की यांनी उत्तर दिलं आणि म्हणाले, आम्हाला हमीसह युद्धबंदी करार हवा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलेंस्की यांच्यातील वाद पाहून व्हाईट हाऊसमध्ये भयाण शांतता पसरली होती.

## जागृती शुगरचे ५ लाख ५,२१४ मेट्रिक टन उसाचे विक्रमी गाळप सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते गाळप हंगामाची गव्हानीचे पुजन करून सांगता समारंभ

लातूर :- राज्याच्या खाजगी साखर उद्योगात भरारी घेणाऱ्या लातूरच्या मांजरा साखर परिवारातील सदस्य असलेल्या देवनी तालुक्यांतील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजने चालु वर्षाच्या २०२४-२५ चालु गाळप हंगामात १०५ दिवसात ५ लाख ५,२१४ मेट्रिक टन उसाचे विक्रमी गाळप केलें आहे शनीवारी चालु वर्षाच्या गाळप हंगामाचा सांगता समारंभ सौ सुवर्णाताई दिलीपरावजी देशमुख यांच्या हस्ते गव्हाणीचे पूजन करण्यात आले यावेळी सौ सविताताई मोरे, सौ उषाताई वैद्य, सौ संध्या पाटील, कारखान्याचे सरव्यवस्थापक गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, चीफ इंजिनियर अतुल दरेकर, शेतकी अधिकारी लक्ष्मण बिरादार, असवानी प्रकल्प प्रमुख विलास पाटील, डेप्युटी चीफ इंजिनियर अक्षय सुर्यवंशी डेप्युटी चीफ केमिस्ट ज्ञानेश्र्वर जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.





जागृती शुगरची भरारी

जागृतीने चालु वर्षात ऊसाचे विक्रमी गाळप करत कारखान्याने इतर प्रकल्प कार्यान्वित केल्याने यावर्षी १कोटी ६८,१४,७०० मेगाव्हेट वीज निर्यात केली आहे एकीकडे उसाची वाढ कमी असतानाही दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अतिशय सूक्ष्म नियोजन व पारदर्शकता ठेवून यंदाही विक्रमी गाळप करत आपल्या सर्कलमधील उस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊसाचे गाळप केले आहे राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी जागृती शुगर चे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जागृती शुगर च्या अध्यक्षा सौ गौरवी अतुल भोसले (देशमुख ) यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने आजतागायत १३ गाळप हंगाम यशस्वी झाले असून शेतकऱ्यांना सर्वाधिक व एफ.आर. पी पेक्षा अधिक भाव देणारा हा कारखाना ठरलेला आहे जागृती शुगर ने सुरवातीपासूनच जागृती शेतकऱ्यांची प्रगती हे ब्रीद वाक्य घेवून अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून काम केल्याने कारखान्याने उपपदार्थ प्रकल्प कार्यान्वित केले असून यावर्षी अल्कोहोल उत्पादन ७७,१३,४८० बल्क लिटर तर इथेनॉल ७०,७४,४९५ बल्क लिटरचे उत्पादन केले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना ३ हजार रूपये भाव देण्याचा प्रयत्न झालेला आहे या भागात या साखर कारखान्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक क्रांती झाली आहे उस उत्पादक शेतकऱ्यांचा उस गाळप करण्याचा प्रयत्न उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांची माहिती

जागृती शुगर ने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अतिशय उत्तम नियोजन करत सर्व उस उत्पादक शेतकऱ्यांचा उस गाळप होईल यासाठी यंत्रणा कारखाना प्रशासनाने राबवली होती यावर्षी उसाची लागवड कमी असतानाही कारखाना प्रशासनाने कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व उस गाळप करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे तसेच यावर्षी उस गाळप झालेल्या उस उत्पादक शेतकऱ्यांना माजी मंत्री सहकार महर्षी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब यांनी जाहीर केल्याप्रमाणे ३ हजार रुपये प्रति मेट्रिक टन ऊसाचे पेमेंट लवकरच अदा करण्यात येणार असल्याची माहिती जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांनी दिली

## कल्पकतेला कृतिशीलतेची जोड द्या, यशस्वी व्हा.. - मा.न्यायमूर्ती शिवकुमार डिगे

आज दि. १ मार्च २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री- शिवकुमार डिगे यांच्या हस्ते ज्ञानप्रकाशच्या 'सृजनानंद महोत्सवाचे उद्घाटन झाले.

मुलांची कल्पकता आणि चिकित्सकतेला नवनिर्मितीचा आनंद मिळवून देणार्या सृजनानंद महोत्सवाचे मा.न्या. शिवकुमार डिगे यांनी कौतुक केले आणि मुलांना शुभेच्छा दिल्या.

ज्ञानप्रकाशमध्ये मुलांना अनुभवातून शिकता यावे, गटागटातून, मित्रमैत्रिणींसोबत, संवादातून जीवनानुभव घेत पारंपारिक ते आधुनिकतेची सांगड घालता यावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो.

शिक्षणाची सुरुवात अ, आ, ई पासून ते आजच्या अख पर्यंत येऊन पोहोचली आहे. मुलांना जे शिकायला आवडतं ते करण्याची संधी ज्ञानप्रकाशमध्ये दिली जाते. त्यात भाषा, गणित, विज्ञान, तंत्रज्ञान यासोबतच जीवनानुभव देणार्या गोष्टी म्हणजे शिवणकाम, लोकरकाम, लाकूडकाम, दागिने, पाककला, करस्व्हिरायटिंग, नेमप्लेट बनवणे, कीचेन तयार करणे, मेहंदी काढणे, विविध प्रकारची साडी परिधान करणे, केशरचना करणे इ. कौशल्य शिकून मुलांनी विविध वस्तू बनवल्या व त्याची मांडणी केली आहे.

या सर्व बाबी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अधोरेखित केल्या आहेत. परंतु ज्ञानप्रकाश ने मागील २५ वर्षांपासून मुलांच्या कल्पकतेला आणि कृतिशिलतेला संधी दिली आहे.

प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर मुलांशी व पालकांशी संवाद साधताना न्यायमूर्ती शिवकुमार डिगे साहेब (मुंबई उच्च न्यायालय) म्हणाले की, ध्येयाच्या मागे जाताना अपयश आले तर घाबरायचं नाही. अपयशाला सावरून पुढे जायचं आणि स्वतःवर आत्मविश्वास ठेवायचा.

स्वत:ला कधी कमी समजू नका. मागच्या बेंचवर बसणारा मी न्यायाधीश झालो. हे त्याचंच एक उदाहरण आहे. सध्या पालक त्यांचं स्वप्न मुलांवर लादतात आणि त्यांच्या भविष्याचा ताण पालकच अधिक घेतात. पण प्रत्येक मुलाचे एक स्वप्न असते. हे ही पालकांनी समजून त्यांना संधी द्यावी. २००५ च्या प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनाला मी वकिल असताना आलो आणि आज २० वर्षानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून २०२५ च्या सृजनानंद महोत्सवाचे उद्घाटन करताना मला मनस्वी आनंद होतो आहे. या २६ वर्षांच्या वाटचालित ज्ञानप्रकाशने गाठलेली उंची पाहून प्रकल्प प्रमुखांच्या दूरदृष्टीचे, शिक्षकांच्या परिश्रमांचे, मुलांच्या कल्पकतेचे व पालकांच्या सहकार्याचे मला कौतुक केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी केले तर सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कृष्णाई आणि रुद्रानी यांनी केले.

उद्घाटन प्रसंगी दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री भाऊसाहेब सरवदे, प्राध्यापक बळवंत सूर्यवंशी केंद्राच्या संचालिका मुख्याध्यापिका सविता नरहरे परिसरातील नागरिक, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## काँग्रेस विधानसभा मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख, विधान परिषद गटनेतेपदी सतेज पाटील

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज (दि.१) काँग्रेस विधिमंडळ पक्ष पदाधिका-यांची घोषणा केली . या संदभातील माहिती महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द अकाऊंटवरून दिली आहे.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेजी यांनी काँग्रेस विधिमंडळ पक्ष पदाधिका-यांच्या नियुक्त्या केल्या जाहीर केल्या. यामध्ये विधानसभा उपनेते म्हणून अमीन पटेल, विधानसभा मुख्य प्रतोद - अमित देशमुख, विधानसभा सचिव, विधानसभा प्रतोद - शिरीषकुमार नाईक आणि संजय मेश्राण. तर विधानपरिषद गटनेतेपदी सतेज ऊर्फ बंटी पाटील (पुर्ननियुक्ती) , विधान परिषद मुख्य प्रतोद- अभिजीत वंजारी तर प्रतोदपदी राजेश राठोड या काँग्रेस नेत्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्र काँग्रेसच्या सर्व विधानसभा आणि विधान परिषद नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे आभार मानत भावी वाटचालीस शुभेच्छा देखील दिल्या आहेत.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेजी यांनी काँग्रेस विधिमंडळ पक्ष पदाधिका-यांच्या नियुक्त्या केल्या जाहीर केल्या. नवनियुक्त सर्व प्रमुख नेत्यांचे मनापासून आभार व भावी वाटचालीस शुभेच्छा.

## भारतीय संविधान या महाग्रंथावरील महापरीक्षेचा निकाल जाहीर ड. मंचकराव डोणे प्रथम तर भूपेंद्र कांबळे द्वितीय

लातूर :- आपला अभिमान, भारतीय संविधान ही भूमिका घेऊन भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त निर्मिती फिल्म क्लब आणि बालसाहित्य कलामंच यांच्या वतीने आयोजित भारतीय संविधानाच्या जन जागृतीसाठी, भारतीय संविधान साक्षरता अभियाना अंतर्गत विश्वरत्न, भारतरत्न, महामानव डा. बाबासाहेब आंबेडकर निर्मित ऐतिहासिक भारतीय संविधान या महाग्रंथावर महाभव्य महापरिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातून २७५ अभ्यासकांनी ही परीक्षा दिली होती. या महाभव्य महापरीक्षेचा निकाल ड. करुणा विमल, अनिल म्हमाने, विश्वासराव तरटे यांनी आज जाहीर केला. लातूर येथील ज्येष्ठ कायदेतज्ञ ड. मंचकराव डोणे यांचा मोठ्या गटात प्रथम क्रमांक आला असून प्रथम क्रमांकाचे भव्य महाबक्षीस ५,००,०००/- ज्यामध्ये एक लाख रुपये रोख आणि चार लाखांची पुस्तके त्यांना मिळणार आहेत. तर जत जि. सांगली येथील भारतीय संविधानाचे अभ्यासक व सुप्रसिद्ध निवेदक भूपेंद्र कांबळे यांचा द्वितीय क्रमांक आला असून द्वितीय क्रमांकाचे भव्य महाबक्षीस ३,००,०००/- ज्यामध्ये पन्नास हजार रुपये रोख आणि अडीच लाखांची पुस्तके त्यांना मिळणार आहेत. लहान गटात कु. सार्थक गावडे प्रथम तर कु. सुवर्णा सुतार द्वितीय क्रमांक आला आहे. महाभव्य महापरीक्षेत प्रत्येक गटासाठी ५० स्पर्धकांची उत्तेजनार्थ म्हणून निवड करण्यात आली आहे. ते स्पर्धक पुढीलप्रमाणे मोठा गट सिद्धार्थ गायकवाड, मेघाराणी देशमुख, अपूर्वा पाटील, संकेत देसाई, आकाश कांबळे, ड. राम धुमाळ, प्रताप कांबळे, डॉ. सचिन पठारे, ऋषिकेश साळुंखे, विक्रम राठोड, दीपक दिवेकर, ड. राहूल घारे, प्रतीक्षा पाटील, दीक्षा गदडे, विवेक जंगम, डॉ. सुरेश सावंत, प्रा. कपिल पाटील, ड. महेश कांबळे, डॉ. कबीर माने, प्रा. रोहिणी पाटील, ड. अनुजा शिंदे, ड. सावली कांबळे, डॉ. राहुल देशमुख, जालिंदर भोसले, ड. सत्यजित देशमुख, प्रा. अलका माने, सतिश कांबळे, ड. मोहन शिंदे, डॉ. नीलम कांबळे, ड. मिलिंद झेंडे, अशोक कांबळे, ड. सुधीर रसाळ, ड. व्ही. एम. जाधव, दिलीप साठे, गोविंद पाटील, रमेश कांबळे, बबन सोनवणे, ड. अविनाश शिंदे, शांताराम माने, दत्तात्रय सूर्यवंशी, जयप्रकाश देसाई, प्रकाश कुंभार, ड. दीपक कांबळे, ड. जी. डी. पाटील, डॉ. विनायक पाटील, ड. बाबा जाधव, श्रुती माने, ड. संगीता सोनुले, ड. योजना देशमुख, सुजाता अडसूळ तर लहान गट लहान गट अभिजीत साठे, अंकुश काकडे, राजू सनशेट्टी, सोपान कुलकर्णी, राहुल देशमुख, राजश्री जामगे, गौरी शिंदे, अनिता पाटील, लक्ष्मण जगताप, सत्यजित पाटील, किरण लोहार, दिगंबर भेगडे, शौर्य कुंभार, लता पाटील, भरत कापसे, अंकिता देसाई, आकाश कांबळे, दादू कामत, दिनेश कांबळे, साकेत कुलकर्णी, सायली पाटील, सदाशिव लोखंडे, साहेबराव जाधव, आदित्य इंगळे, नवीन कापसे, केदार शिंदे, अलका मांडके, किशोर कदम, कुंदा राऊत, अण्णा देशमुख, सतिश कांबळे, आकाश लोहार, अभिजित सावंत, संजय पवार, राहुल कांबळे, सानिया मकानदार, साहेबराव पाटील, मनिषा काळे, सोनाली पाटील, ऋषिकेश देसाई, अर्चना काळे, लक्ष्मण पाटील, राहुल माने, अंकुश कांबळे, सुखदेव काकडे, बाबासाहेब पाटील, सुरेश पाटील, अंबरीश साठे, संजय सावंत, योगेश शेंडगे या स्पर्धकांना प्रत्येकी ३,०००/- हजारांची पुस्तके मिळणार आहेत. बक्षीस वितरण समारंभ रविवार दि. १३ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी १०:३० वा., राजर्षी शाहू स्मारक भवन, कोल्हापूर या ठिकाणी होणार असून संविधान प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अंतिमा कोल्हापूरकर, अर्हंत मिणचेकर यांनी केले आहे.

## संपादकीय....

# सहकाराच्या नव्या दिशा, नवी आव्हाने

खेळत्या भांडवलाचा अभाव, अपुरे प्रशिक्षण, नव्या नेतृत्वाच्या उणिवा आणि माहिती– तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष अशा अनेक अडचणी असल्या, तरी प्रबळ इच्छाशक्तीच्या आधारे सहकार चळवळीला वैज्ञानिक प्रयत्नाची व नव्या व्यवस्थापन प्रणालींची जोड देऊन भारत जगामध्ये सहकार क्रांती घडवू शकेल.

कोऑपरेटिव्ह हा शब्द कोऑपरेट या लॅटिन शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ एकत्र सहकार्याने काम करणे असा होतो. जगभरामध्ये सहकार चळवळ ही रॉचडेल यांच्या ऐच्छिक आणि मुक्त सदस्यत्व, लोकशाही कार्यप्रणाली, आर्थिक सहभाग, स्वायत्त व स्वतंत्र, शिक्षण आणि प्रशिक्षण, परस्पर संस्थात्मक सहकार्य आणि समाजाभिमुख दृष्टी या सात तत्त्वांवर आधारलेली आहे. २०१२ मध्ये प्रथमतः आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे केले होते. दारिद्र्य निर्मूलन व लोककल्याणातील प्रभाव स्पष्ट करणे हा सहकाराचा हेतू होता. आता व्यापक दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास मोहिमेला गतिमान करण्यासाठी पुन्हा सहकार वर्ष साजरे केले जात आहे. २० जून २०२४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने ठराव संमत करून २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले. सहकारी संस्था या भविष्यात चांगले जग घडविण्याचे कार्य करतील, या संकल्पनेचा विकास करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने एखाद्या क्षेत्राविषयी किंवा प्रश्नाविषयी वैश्विक पातळीवर समग्र जगाच्या कल्याणासाठी लोकप्रबोधनाच्या हेतूने आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे केले जात असते. भारतामधील सहकार चळवळ आज नव्या वळणावर उभी आहे. भारताचे राष्ट्रीय सहकार धोरण दृष्टिपथात आले आहे. 'सहकाराकडून समृद्धीकडे' असा नारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी सहकार चळवळीला नवचैतन्य देण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी करून सहकार चळवळीमध्ये एक नवा प्राणवायू दिला आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शाश्वत विकासात सहकार चळवळीची भूमिका संयुक्त राष्ट्रसंघाने विशेषत्वाने अधोरेखित केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या या ठरावातील मौलिक भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. सहकार हे शाश्वत विकासाचे सामर्थ्यशाली माध्यम होय. या सूत्रावर संयुक्त राष्ट्रसंघाने सहकार वर्षाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. वर्तमान जगातील सर्व जटिल प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने सहकाराला महत्त्वाचे स्थान दिले आहे. २०३० पर्यंत शाश्वत विकासाची लक्ष्ये साध्य करण्यामध्ये सहकाराची भूमिका सामर्थ्यशाली ठरणार आहे. यासंदर्भात सहकारी संस्था, कार्यकर्ते आणि सहकारी यंत्रणा किती महत्त्वाच्या आहेत, हे दर्शविण्यासाठी प्रस्तुत वर्षाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय वर्षाचा केंद्रबिंदू सहकाराच्या माध्यमातून नवे जग निर्माण करावे, असा आहे. २०२५ या वर्षाला आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून का घोषित करण्यात आले, या प्रश्नाचे तीन प्रमुख उत्तरे अशी आहेत. पहिले म्हणजे, सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासातील योगदानाबद्दल जागरूकता वाढविणे, हे होय. दुसरे असे की, या वर्षाचा हेतू सदस्य राष्ट्रांपर्यंत सहकाराची मधूर फळे पोहोचविणे हा होय. तिसरे म्हणजे, सहकाराच्या माध्यमातून मनुष्यबळनिर्मिती, मनुष्यबळाचा विकास आणि रोजगारनिर्मितीद्वारे शाश्वत विकासाला गती देणे, हा होय.

२०१२च्या पहिल्या टप्प्यात दारिद्र्य कमी करणे आणि रोजगार निर्मिती व सामाजिक एकात्मतेवर सकारात्मक परिणाम अधोरेखित करणे यावर भर दिला होता. जगभरातील सहकारी संस्थांनी या वर्षात बरेच उपक्रम राबवून सहकाराचे महत्त्व वाढविले होते. आता २०२५ मध्ये पुन्हा शाश्वत विकासाच्या संदर्भात सहकाराला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला आहे. व्यापक प्रमाणावर समुदायाच्या गरजा आणि लोककल्याणकारी हितसंबंधांचे संतुलित रक्षण करण्यासाठी या वर्षात प्रयत्न करावयाचा आहे. त्यासाठी जगात सर्वत्र समाजाच्या सर्व क्षेत्रांत कार्यरत सहकारी घटकांना गतिमान करावयाचे आहे. सहकारी संघांना सामायिक हेतूने संस्थाचलित कार्याशी सुसंगत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यप्रवणता, नेतृत्वाचा विकास, सल्लागार मंडळांचे सक्रिय स्वरूप, धोरणात्मक सुसंवाद या घटकांवर भर देण्यात आला आहे. लोककेंद्रित, स्वयंकेंद्रित आणि शाश्वत विकासकेंद्रित सहकारी उपक्रमांना चालना देण्यासाठी या वर्षात विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. सहकारी संस्थांच्या वाढीसाठी उद्योजकीय परिसंस्था आणि आस्थापना अधिकाधिक मजबूत करण्यावर या वर्षात भर दिला जाईल. पायाभूत विकास करून पूरक व सहाय्यभूत संस्थात्मक चौकटींच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्यावर या वर्षात भर दिला जाणार आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर सहकारी संस्थांना सक्षम करण्यासाठी कायदेशीर धोरणात्मक वातावरणनिर्मितीला प्रोत्साहन मिळेल. तसेच नव्या युगात सहकारी नेतृत्वाच्या विकासासाठी नवी ऊर्जा देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे हेतूपूर्वक नेतृत्व वृद्धीसाठी प्रयत्न करून अधिकाधिक तरुणांना सहकार चळवळीत सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात व्यूहरचना करावयाची आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष हे सहकार चळवळीमध्ये नवयुग निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे गलितगात्र व शिथिल झालेल्या सहकार चळवळीला नवसंजीवनी लाभू शकेल. संबंधित भागधारकांना सहकार चळवळीच्या विकासासाठी प्रोत्साहित करणे हा या धोरणाचा मुख्य गाभा आहे. शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीत सहकारी संस्थांचे योगदान मोठे असणार आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्याची रंगीत तालीम

नाशिक–त्र्यंबकेश्वर शहरांत २०२७ मध्ये होऊ घातलेला सिंहस्थ कुंभमेळा निष्कंटक, आपदाविरहित व्हावा, यासाठी राज्य सरकार अलर्ट मोडवर आले आहे. नुकत्याच पार पडलेल्या उत्तर प्रदेशातील प्रयागराज महाकुंभमेळ्यात निर्माण झालेल्या लहानसान संकटांची व्युत्पत्ती आगामी काळात होऊ नये, यासाठीची खबरदारी घेण्याची सरकारची भूमिका आहे.

एक मेगा इव्हेंट म्हणून तो शत–प्रतिशत यशस्वी होण्यासाठी म्हणूनच सुमारे दोन–अडीच वर्षे आधीच सूक्ष्म नियोजनांतर्गत बैठकींचे सोपस्कार पार पाडले जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या तिसर्या आढावा बैठकीत अनेक मुद्द्यांवर झालेली चर्चा म्हणजे नियोजन, समन्वय आणि द्रुतगती परिचालन या त्रिसूत्रीची बांधबदिस्ती असल्याचे म्हणता येईल. प्रयागराज कुंभमेळा नियोजन, तिथे आकस्मिक घडलेल्या दुर्घटना आणि उद्भवलेली वाहतूक कोंडी या बाबी नाशिक–त्र्यंबकेश्वरमधील आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जणू आरसा ठरावा. प्रयागराजला एकूण ६६ कोटी भाविकांची गर्दी झाल्याची सरकार दप्तरी नोंद झाली आहे. नाशिक–त्र्यंबकला २०१४–१५ मधील कुंभमेळ्यात झालेल्या गर्दीच्या चार ते पाच पट गर्दी आगामी काळात होण्याची शक्यता आहे. भौगोलिकदृष्ट्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील अनुक्रमे रामकुंड व कुशावर्त ही मुख्य स्थळे दोन्ही शहरांच्या भरवस्तीत आहेत. शिवाय दोन्ही ठिकाणांहून अगदी पाच किलोमीटर परिसर गृहीत धरला, तरी अरुंद रस्ते आणि तदनुषंगिक गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान लक्षात घेता जोखमीचा आलेख उंचावता राहणार, हे नक्की! २००३ मधील सिंहस्थ कुंभमेळ्यात नाशिकमधील अरुंद गल्लीत चेंगराचेंगरी होऊन तब्बल ३१ भाविकांना प्राण गमवावे लागले होते. याच अनुषंगाने आताच्या कुंभमेळ्यात डिजिटल आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर शासक–प्रशासकांचे एकमत झाले, हे सकारात्मक पाऊल मानले जावे.

वाहतूक कोंडी आणि वाहनांद्वारे होणारे मोठ्या प्रमाणावरील प्रदूषण टाळण्यासाठी बाहेरील भाविकांना ई–बसेस उपलब्ध करून देण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना स्वागतार्ह आहे. रस्त्याच्या कडेला टेंट सिटी उभारणी, शिर्डी– ओझर– छत्रपती संभाजीनगर विमानतळांवर प्रवासी नियोजन, नाशिकमधील हेलिपॅड संख्यावाढ, रामकुंड– कुशावर्तसह इतर कुंडांचे सौंदर्यीकरण, नाशिकमधील रामकाल पथाचे निर्माण यादेखील नियोजनाला बळ देणार्या बाबी आहेत. कुंभमेळ्याला उपस्थिती दर्शवणार्या देशभरातील भाविकांमध्ये प्रवासासाठी सर्वाधिक पसंती रेल्वे प्रवासाला असते. स्वाभाविकच नाशिक रोड, इगतपुरी आणि कसारा रेल्वेस्थानकांत वैविध्यपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. कुंभमेळ्यानिमित्त नाशिक–त्र्यंबकला येऊ घातलेला भाविकांचा ओघ समीपच्या धार्मिकस्थळी जावा म्हणून त्र्यंबक–शिर्डी–वणी– शनिशिंगणापूर–मांगीतुंगी हा धार्मिक कॉरिडॉर म्हणून विकसित करण्यावरही बैठकीत शिक्कामोर्तब झाले. यामुळे या स्थळांची जगभर ओळख निर्माण होऊन अर्थकारणालाही बळकटी निर्माण होण्याची शक्यता अधिक गडद होईल. प्रयागराज कुंभपर्वात सध्या नाशिकचा प्रशासकीय गाडा हाकणार्या सर्वच उच्चस्तरीय अधिकार्यांनी भेट देऊन तेथील नियोजनात्मक आढावा घेतला होता. ती एकप्रकारे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी रंगीत तालीम ठरावी, ही अपेक्षा आहे.

गेल्या सिंहस्थ कुंभपर्वापेक्षा आगामी कुंभमेळा कमाल तंत्रज्ञानाच्या वापरातून वेगळेपण सिद्ध करणारा ठरणार आहे. आज विविध क्षेत्रांचा ताबा घेऊन प्रभाव निर्माण करणार्या डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर कुंभपर्वात पावलोपावली होणार, हे स्पष्ट झाले आहे. याद्वारे गर्दी नियंत्रण, घात–अपघात अथवा दुर्घटनामुक्त वातावरण यासारखे उद्देश साध्य होणार आहेत. त्याच अनुषंगाने मुख्यमंत्र्यांच्या भाषेत आगामी कुंभपर्व डिजिटल टेक्नो कुंभ म्हणून लौकिकास पावावा, यासाठी प्रशासन कंबर कसणार, यामध्ये शंका नाही. सिंहस्थ कुंभमेळा यशस्वी करून मराठी मुलखासह देशातील भाविकांच्या



समाधानाचे शिक्कामोर्तब करून घेण्यासाठी राज्याचे मुखिया या नात्याने देवेंद्र फडणवीस नियोजनात लक्ष घालून आहेत. अर्थात, त्यांच्या प्रयत्नाचा यशालेख अनुभवण्यासाठी दोन वर्षांहून अधिक काळाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# या नराधमापेक्षा जनावरं परवडली....

आठ मार्च जागतिक महिला दिन अगदी जवळ येऊन ठेपलाय. जागतिक महिला दिन कसा साजरा करायचा? कुठले विषय घ्यायचे? कोण वक्ते चांगले बोलतील?... इत्यादी विषयी नियोजन सुरू झाले असतानाच पुण्यातील बलात्कार प्रकरणाने मन सुन्न झाले. स्वारगेट बस स्थानकात थांबलेल्या शिवशाही बसमध्ये एका नराधमाने २६ वर्षाच्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची बातमी झी २४ तास या वृत्तवाहिनीवर दाखविण्यात आली. सकाळी अनेक दैनिकात ही बातमी आली. त्यानुसार ही तरुणी स्वारगेट बस स्थानकात फलटणला जाण्यासाठी पहाटे पाच वाजता बस शोधत होती. अशातच आरोपीने तिला गाठले. ताई, फलटणला जाणारी बस दुसऱ्या फलाटावर लागते. मी काही वर्षांपासून येथेच असतो, असे म्हणत त्याने तरुणीचा विश्वास संपादन केला. त्याने तरुणीला सोलापूरहून स्वारगेटला मुक्कामी आलेली शिवशाही बस दाखविली .परंतु त्या बसमध्ये एकही प्रवासी नव्हता. तेव्हा तरुणीने बसमध्ये तर एकही प्रवासी नाही असे विचारले असता त्यावर त्याने हीच बस फलटणला जाते. तुम्ही आत बसा असे सांगितले. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तरुणी बस मध्ये बसली. तिच्या पाठोपाठ हा नराधम बस मध्ये गेला. त्यानंतर आरोपीने बसचा दरवाजा बंद करून तरुणीवर अत्याचार केला. अन्याय अत्याचार झाल्यानंतर साधारणपणे ज्या प्रतिक्रिया उमटतात त्या उमटल्यात. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न कुठे गेला? हा प्रश्नही विचारण्यात आला. हा गुन्हा पोलिसांनी (पोलीस आयुक्तांनी बरं का!) गांभीर्याने घ्यावा अशी नेहमीप्रमाणे माफक अपेक्षा करण्यात आली. कारण जिथे हा गंभीर गुन्हा घडला तिथे यापूर्वी लूट आणि प्रवाशांना मारहाण केल्याच्या घटना घडल्या आहेत असं समजतं. त्यामुळे पोलीस विभागाकडे अंगुली निर्देश करून पोलीस विभाग काय करीत होता? असा प्रश्नही विचारला गेला. राष्ट्रीय महिला आयोगाने दखल घेतली आणि न्यायाची मागणी केली. आता तपास समित्यांची निर्मिती ही ओघानेच आली. आणि सहा पदके निर्माण झाली. आता आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडून अशा गुन्ह्यांचे राजकारणही होईल. त्याची आता सुरुवात झालेलीच आहे. पण त्याने तरुणीवर झालेला प्रसंग आणि त्यात गेलेली तिची इज्जत ही कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे . हे कोण भरून देणार ? हा खरा प्रश्न आहे .संबंधित गुन्ह्यातील आरोपीला अनेक गुन्ह्यांची पार्श्वभूमी आहे. त्याच्यावर त्याच परिसरात सहा गुन्ह्यांचे आरोप आहेत. आणि तरीही आरोपी एका कंपनीत कामाला आहे असे समजते. सहापैकी एकही गुन्ह्यात त्याला शिक्षा झाली नसावी असाच बहुतेक अर्थ निघतो. यावरून न्याय किती मंद गतीने पावले टाकत चालतो आहे ,त्याचा वेग किती मंद आहे हे लक्षात घेण्यासारखं आहे. न्यायदानासारख्या क्षेत्रातील अनेक न्यायाधीशांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे तारीख पे तारीख तारीख पे तारीख असा अन्याय पिडितावर होतो. आणि हा अन्याय पीडित मूकपणे भोगत राहतो. आत्ताच एका राजकीय पुढार्याला दोन वर्षांची शिक्षा झाली अशी बातमी उडत आली आहे. पण तक्रारकर्त्याने ३० वर्षांपूर्वी याचिका दाखल केली होती. म्हणजे तक्रार केली होती. आणि तीस वर्षा पूर्वी केलेली तक्रार त्याचा निकाल लागायला तीस वर्षांचा काळ लोटला. तोपर्यंत राजकारणात इकडे तिकडे करायला राजकीय पुढार्याला बराच वेळ मिळाला. सत्ता भोगता आली. बलात्कार प्रकरणातही आरोपीला सहा आरोपात शिक्षा मिळाली असती तर त्याला हा अतिप्रसंग करायला संधी मिळाली नसती. आता चोर सोडून संन्याशाला फाशी होईल. परिवाहन विभागाचे एक दोन अधिकारी, कर्मचारी कारण नसताना किंवा असताना बडतर्फ वगैरे होतील. एक दोन पोलीस विभागातील कर्मचारी ही नोकरीपासून वंचित होतील . म्हणजे काय तर वांग्याचे तेल वड्यावर होईल. या साऱ्या भानगडीत आरोपीला शिक्षा होईलच याची खात्री नाही. अशा घटना घडल्याची की सर्वच क्षेत्रातून जलद गती न्यायालयाची मागणी होते. ती मागणी धूळ खात बसते. पुरावे गोळा करण्याकरता करताच कधी पिडित तर कधी आरोपी हे जग सोडून जातो. अगदीच तीन महिन्यांपूर्वी घडलेला हत्याकांड बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील आरोपी फरार आहे. न्यायदान ही प्रक्रिया अतिशय मंद पाऊले टाकते या प्रवासात अनेकदा फाइल्स इकडच्या तिकडे होतात. कधी कधी तर त्या हरवतात असा आपल्या न्यायव्यवस्थेचा अनुभव आपण सर्वांनी अनुभवला आहे. त्या फाइल्स दडविण्यासाठी मध्यंतरी जी राजकीय उलथापालत झाली ती सर्वज्ञात आहे. त्यामुळे पुणे शहरातील तरुणीवर झालेल्या अतिप्रसंगाला किंवा अत्याचाराला लवकर न्याय मिळेल अशी अपेक्षा करणे किती योग्य राहील याचा विचार न केलेलाच बरा. तिरंगा चित्रपटात नाना पाटेकर यांच्या तोंडी असलेले संवाद आठवतात ते म्हणतात ,यह जाचवाच की फाईले होती है ना यह थुलमुल सरकार बदलते ही गुम हो जाती है .यह दिल्ली बस मु है इसलिये पटपटर करते रहती है .ये होना चाहिये वो होना चाहिये बस...,' सध्याच्या न्यायव्यवस्थेवर असाच संताप व्यक्त करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. सरकारने अशा आरोपींसाठी जलद गती न्यायालय नेमणे गरजेचे आहे. त्याचबरोबर न्यायाधीशांची रिक्त पदे तातडीने भरून काढावीत. त्यामुळे इतर न्यायाधीशांवर असलेला ताण कमी होईल. आणि न्यायाची पावले शीघ्रगतीने जलद गतीने पडतील. या घटनेने मनात जी संतापाची लाट आहे ती व्यक्त करायला शब्द अपुरे पडतात. आरोपीने पीडित तरुणीला दोन वेळा ताई म्हटलं आहे. आई आणि ताई हे नातं सर्व नात्यांचा बाप आहे. ताई म्हणून त्याने जो पाशवी बलात्कार केला तशी त्याला त्याची ताई आठवायला हवी होती. पण संस्काराच्या पाठशाळा कधी कधी कमी पडतात. म्हणून तर आरोपीवर यापूर्वीही सहा गुन्ह्यांची नोंद आहे .प्राणी आणि मानव यात मूलभूत फरक निसर्गाने केलेला आहे. प्राणी नाती पाळत नाहीत. कारण त्यांच्यात विचारक्षम आणि संस्कारक्षम असं मन नाही. म्हणून तिथे नात्यांना महत्त्व नाही . परंतु माणूस हा प्राणी हुशार आहे असं म्हटलं जातं. आणि तो समूहाने राहतो. म्हणून कुटुंब एक व्यवस्था आहे त्यातून विकसित झालेली व्यवस्था म्हणजे समाजव्यवस्था. म्हणूनच तो समाज व्यवस्थेचा एक भाग असतो. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात राहताना समाजानं घालून दिलेली प्रमाण आणि मूल्य हे आपण शिरोधार्य मानली पाहिजेत. कारण हे मूल्य ही नीतिमत्ता आपल्याला वागण्याविषयीचा रीतभात शिकवते. असा हरितभात शिकवण्यासाठी प्राण्यांमध्ये कुटुंब किंवा समाज व्यवस्था नसते. बहुतेक प्राणी हे वेगवेगळे राहतात. जन्माला घातलेलं पिल्लू किंवा घरट्यातुन निघालेली पिल्लं नंतर आईकडे कधी येत नाहीत . माणसाचं मात्र तसं नाही. तो नाती जपत राहतो. मित्र मैत्रीण आई वडील बहीण भाऊ या नात्यात तो गुंतून राहतो . तिथे कुटुंब व्यवस्था निर्माण होते आणि या कुटुंब व्यवस्थेतून समाज व्यवस्था निर्माण होते. ही समाजव्यवस्था एक वेटाळ, मोहल्ला, गाव आणि मग राष्ट्र वगैरे संकल्पनांना जन्म देते. या साऱ्या व्यवस्थेत जगताना स्वतःचा एक आदर्श निर्माण करायचा असतो. आदर्श समाजात अशी चुकीची माणसं न्यायालयीन प्रक्रियेने काढून टाकली पाहिजेत. यानंतर कोणत्याही महिलेवर तरुणीवर किंवा चिमुरडीवर असा अन्याय अत्याचार होणार नाही याची समाजव्यवस्थेनं आणि न्यायव्यवस्थेनं कायदा आणि सुव्यवस्थेनं काळजी घेतली पाहिजे. या समाजाचा एक संवेदनशील व्यक्ती म्हणून मी घटनेचा जाहीर निषेध करतो. आणि हा निषेध सर्वमान्य आहे असं मला मनापासून वाटतं.



– – – – – – – –
राजू बोरकर
जि. भंडारा
७५०७०२५४६७

# महिला अत्याचार; एक चिंतन

पुणे येथील घटनेचे सध्या पडसाद उमटत आहे. सरकार, प्रशासन आपली बाजू मांडून सावरण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे. मात्र यापुढे महिलांनी आरडाओरडा केला तरच सरकार, पोलीस प्रशासन गुन्हा घडल्याचे मान्य करणार आहे का?


महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाने महिला सुरक्षेच्या बाबतीत कायद्याची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. जर एखाद्या गुन्हेगाराने गुन्हा केला तर त्या गुन्ह्याचा तपास आणि कोर्ट ट्रायल ही ९० दिवसांच्या आत संपली पाहिजे आणि तात्काळ कायदेशीर बाजूने जास्तीत जास्त शिक्षा आरोपींना झाली पाहिजे. सध्या महिला संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत.

त्यामध्ये शक्ती कायदा असेल पोक्सो कायदा असेल किंवा या प्रकारचे अनेक कायदे अमलात आहेत. परंतु आपली तपास यंत्रणा, आपली न्यायालयीन कामकाजाची पद्धती या सगळ्या गोष्टींमुळे अशा घटनांच्या बाबतीत अनेक अडथळे येतात. कोणतेही टाइम लिमिट पाळले जात नाही त्यामुळे अशा घटना घडविणार्या गुन्हेगारावर म्हणावा तेवढा वचक राहत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस गुन्हेगारी वृत्ती वाढत आहे.

प्रत्येक वेळी घटना घडल्यानंतर थोड्या कालावधीपर्यंत वातावरण खूप काही करण्याच्या दृष्टिकोनातून निर्माण होते. परंतु जस जसा वेळ जाईल तसं तसं त्या घटनेविषयीचं गांभीर्य कमी होतं. अलीकडच्या काळात प्रिंट मीडियावर अनेकांचा विश्वास बसत आहे. कारण टीआरपीच्या माध्यमातून सोशल आणि दूरचित्रवाणी हा मीडिया विश्वासार्हता कुठेतरी कमी करून घेत असल्याचे चित्र आपणाला दिसतं. परंतु अशा ज्या काही महिलांच्या अत्याचाराच्या अन्यायाच्या बलात्काराच्या घटना घडल्या की त्या ठिकाणी प्रत्येक वाहिनी त्यांच्या त्यांच्या अँगलने बातम्या देतात. अलीकडच्या काळात महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटना खूप मोठ्या प्रमाणामध्ये घडत आहेत आणि त्या घटनांमुळे महाराष्ट्रातलं सामाजिक वातावरण खूप काही दूषित झालेलं आहे असं चित्र सध्या तरी दिसून येतात.

दिवसाढवळ्या खून पडतात, दिवसाढवळ्या अन्याय अत्याचार केले जातात, दिवसाढवळ्या महिलांवर मुलींवर बलात्कार होत आहेत, दिवसाढवळ्या फसवणुकीचे गुन्हे त्या ठिकाणी केले जात आहेत. जो कोणी आरोपी असेल तो कुठे ना कुठेतरी समाजातच लपलेला असतो आणि त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकांनी प्रामाणिक आणि जागरूक राहून अशा पद्धतीचे जे काही गुन्हेगार आहेत त्या गुन्हेगाराला तात्काळ पोलिसांच्या तपासी यंत्रणांच्या हवाली केला पाहिजे आणि पोलीस यंत्रणेनेसुद्धा सदैव जागृत राहिले पाहिजे. गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो. गुन्हेगारावर विश्वास ठेवता कामा नये. तो कधी घात करील काही सांगता येत नाही. चिरीमिरीच्या माध्यमातून अशा गुन्हेगारांना कदापिही पोलीस प्रशासनाने जवळ केलं नाही पाहिजे. पुण्यात घडलेल्या घटनेच्या बाबतीत किती धक्कादायक वाटतं, किळसवाणं वाटतं की सकाळी पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान मुख्य ठिकाण असतानाही अशी घटना घडते आणि प्रत्येक बस स्टॅन्डमध्ये अशा खराब झालेल्या बसेस उभ्या असतात. मग या घटनेमुळे त्या प्रत्येक बस स्टॅन्डमध्ये अशा घटना घडतात काय हा प्रश्न पुन्हा त्या ठिकाणी निर्माण होतो. म्हणजे या बस स्टॅन्डमध्ये ही घटना घडली म्हणून सगळ्या बस स्टॅन्डमध्ये आता सतर्कता बाळगली जाईल. थोड्या दिवस हे सगळं चालेल.

# हाडं पोकळ झालीयेत? सांधे दुखतायेत? मग आजच आपल्या आहारात या १० रुपयांच्या भाज्यांचा समावेश करा; मृत नसाही होतील जिवंत





सध्याचे जीवन हे धावपळीचे आणि व्यस्त जीवन आहे. आपल्या कामाच्या गडबडीत आपण इतके गुंतून जातो की बऱ्याचदा यामुळे आपले आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ लागते. आपल्या शरीराला आवश्यक जीवनसत्त्वांची गरज असते आणि हे पोषक घटक शरीराला न मिळाल्यास आपल्याला आरोग्याच्या समस्या जाणवू लागतात. यातील एक वाढत चाललेली समस्या म्हणजे व्हिटॅमिन इ१२ ची कमतरता. झोपेतून उठताच थकवा जाणवणे, सतत चिडचिड होणे आणि अशक्तपणा जाणवणे ही व्हिटॅमिन इ१२ च्या कमतरतेची काही लक्षणे आहेत.

अनेकांना असे वाटते को फक्त मांसाहारातूनच आपल्या शरीराला व्हिटॅमिन इ१२ मिळते मात्र असे नाही. बऱ्याच जणांना हे ठाऊक नाही पण काही साध्या भाज्यांच्या सेवनाने तुम्ही शरीरातील व्हिटॅमिन इ१२ ची कमतरता भरून काढू शकता. त्यामुळे आता बाजारातील महागडे सप्लिमेंट्स विसरा आणि स्वस्त भाज्यांचे सेवन सुरु करा.

भोपळा

भोपळा ही अनेकांची नावडती भाजी आहे मात्र आरोग्यासाठी याचे सेवन फार फायद्याचे ठरू शकते. भोपळ्यामध्ये व्हिटॅमिन इ१२ चे अधिक असते. शिवाय याचे नियमित सेवन पचनसंस्थेचे कार्य सुधारते. त्यामुळे ही स्वस्त भाजी आजपासून खायला सुरुवात करा. बाजारात तुम्हाला ती सहज उपलब्ध होईल. तुम्ही यापासून अनेक चविष्ट असे पदार्थ तयार करू शकता. पालक

पालेभाज्या या नेहमीच आपल्या आरोग्यासाठी फायद्याच्या ठरत असतात. पालकही त्यातीलच एक आहे, यात लोह, फायबर्स आणि व्हिटॅमिन इ१२ भरपूर प्रमाण आढळते. जर तुम्हाला शरीरात व्हिटॅमिन इ१२ ची कमतरता जाणवत असेल तर आहारात पालकचा आवर्जून समावेश करा. याच्या नियमित सेवनाने शरीरातील रक्ताची कमतरताही दूर होते.

जेवणाआधी प्या ही टेस्टी स्मूदी; वजन झपाट्याने कमी होऊन अंथरुणात पडताच लागेल शांत झोप

कोबी

कोबीमध्ये फायबर्स, जीवनसत्त्वे आणि अनेक अँटीऑक्सिडंट्स आढळले जातात जे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. शरीरातील व्हिटॅमिन इ१२ ची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही आहारात कोबीचा समावेश करू शकता. यापासून कोबीची भाजी, सूप, पराठे असे अनेक पदार्थ बनवले जाऊ शकतात.

# मिझोरममध्ये चे ३०००० पेक्षा जास्त केस, तज्ज्ञांनी सांगितले खरे कारण

मिझोरममध्ये एचआयव्ही संसर्गाची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. ही चिंतेची बाब आहे कारण येथे एचआयव्हीचा दर २.७३% आहे, जो एकूण भारतीय सरासरी ०.२% पेक्षा खूपच जास्त आहे. राज्याचे आरोग्यमंत्री लालरिनपुई यांनी गंभीर परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आणि खासदारांना या आजाराचा सामना करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे आवाहन केले.

ऐझॉल येथे झालेल्या 'मिझोरम लेजिस्लेटिव्ह फोरम ऑन एड्स' बैठकीत मिझोरम स्टेट एड्स कंट्रोल सोसायटी (एमएसएसीएस) च्या प्रकल्प संचालक डॉ. जेन आर. राल्टे यांनी एचआयव्ही बद्दल माहिती दिली. त्यांच्या मते, जानेवारी २०२५ पर्यंत, मिझोराममध्ये ३२,२८७ लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळले आहेत आणि ५,५११ लोकांचा मृत्यू झाला आहे. एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ या काळात १,७६९ नवीन प्रकरणे नोंदवली गेली. एचआयव्ही संसर्गाची कारणे डॉ. राल्टे म्हणाले की, ६७% प्रकरणे असुरक्षित लैंगिक संबंधांमुळे झाली आहेत. ३०.४४% प्रकरणे दूषित सुयांच्या वापरामुळे झाली. तथापि, राज्यात नवीन संसर्ग आणि एचआयव्ही मृत्यूंमध्ये घट झाल्याची काही सकारात्मक चिन्हे असल्याचेही त्यांनी सांगितले.

सरकारने उचललेली पावले

आरोग्यमंत्र्यांनी नियमित रक्त चाचण्या आणि एआरटी औषधे वेळेवर घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. एचआयव्ही बाधित लोकांना मदत करण्यासाठी ड्रॉप-इन सेंटर्सचा अधिक चांगला वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. याशिवाय, एचआयव्ही पॉझिटिव्ह लोकांना एआरटी औषधे मिळत राहावीत यासाठी राज्याच्या आमदारांनी २०२४-२५ साठी त्यांच्या आमदार निधीतून ५०,००० रुपये देण्याचे मान्य केले आहे.

एचआयव्ही स्व-चाचणी (एचआयव्हीएसटी)

मंगळवारी, आरोग्य मंत्रालयाने एचआयव्ही स्व-चाचणी (एचआयव्हीएसटी) ही एक महत्त्वाची उपक्रम असल्याचे वर्णन केले. या चाचणी सुविधेमुळे लोकांना त्यांच्या घरी सोयीस्करपणे चाचणी घेता येते. स्व-चाचणी किटच्या मदतीने, लोक त्यांच्या लाळेचा किंवा रक्ताचा नमुना घेऊ शकतात आणि काही मिनिटांतच निकाल जाणून घेऊ शकतात. या सुविधेमुळे, लोक घरी गोपनीय पद्धतीने स्वतःची चाचणी करू शकतात. दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना लांबचा प्रवास करावा लागणार नाही.

# घरी बनवा रेस्टॉरंट स्टाईल नवाबी पनीर; चव चाखताच बोटं चाटत राहाल, घरचेही होतील खुश





पनीर हा पदार्थ सर्वांच्याच आवडीचा आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत याची चव सर्वांनाच फार आवडते. पनीरपासून आपण पनीर पराठा, भुर्जी, मटर पनीर असे अनेक पदार्थ बनवू शकतो मात्र आज आम्ही तुमच्यासाठी एक खास आणि पनीरची एक अनोखी रेसिपी घेऊन आलो आहोत. या रेसिपीचे नाव आहे नवाबी पनीर. हा पदार्थ अधिकतर तुम्ही रेस्टॉरंटमध्ये खाल्ला असेल मात्र आज आम्ही तुम्हाला हा पदार्थ घरी कसा तयार करायचा याची एक सोपी रेसिपी सांगणार आहोत.

जर तुम्ही कांदा आणि लसूण खात नसाल पण तरीही रेस्टॉरंट सारखी चव हवी असेल तर नवाबी पनीर तुमच्यासाठी योग्य आहे. ही डिश मलईदार, समृद्ध आणि शाही चवीने परिपूर्ण आहे, जी तुम्ही घरी सहज बनवू शकता. विशेष म्हणजे यात कांदा किंवा लसूण नाही, तरीही त्याची चव शाही मेजवानीपेक्षा कमी लागत नाही. चला तर मग जाणून घेऊया नवाबी पनीरची झटपट रेसिपी. यासाठी लागणारे साहित्य आणि कृती नोट करून घेऊयात.

साहित्य २०० ग्रॅम पनीर १/२ कप दही १/२ कप काजू २ चमचे मलाई १/२ कप दूध

२ हिरव्या मिरच्या १ छोटा तुकडा आले

१/२ टीस्पून बडीशेप पावडर

१/२ टीस्पून गरम मसाला १/२ टीस्पून धने पावडर

चवीनुसार मीठ १/२ टीस्पून पांढरी मिर्ची पावडर

१/२ टीस्पून साखर १/२ टीस्पून वेलची पावडर

२ चमचे देसी तूप गार्निशसाठी चिरलेली कोथिंबीर

बदाम-पिस्ता

कृती यासाठी सर्वप्रथम भिजवलेले काजू दुधात मिक्सरमध्ये बारीक करून त्याची स्मूद पेस्ट बनवा

कढईत देशी तूप गरम करून त्यात आले आणि हिरवी मिरची घालून हलके परतून घ्या

आता त्यात काजूची पेस्ट घाला आणि मंद आचेवर २-३ मिनिटे शिजवा, जोपर्यंत त्याचा कच्चापणा निघून जात नाही

आता त्यात फेटलेले दही घाला आणि सतत ढवळत राहा, म्हणजे दही दही होणार नाही

ग्रेव्ही घट्ट होऊ लागली की त्यात क्रीम, पांढरी तिखट, एका जातीची बडीशेप, वेलची पावडर, गरम मसाला आणि मीठ घाला


आता त्यात पनीरचे तुकडे घालून मंद आचेवर ३-४ मिनिटे शिजू द्या

थोडी साखर घाला जेणेकरून सर्व चव बॅलन्स होतील आणि ग्रेव्ही आणखी २ मिनिटे शिजू द्या

शेवटी यावर चिरलेली कोथिंबीर घाला आणि नवाबी पनीर खाण्यासाठी सर्व्ह करा

# इडली पात्राचा वापर करून उन्हाळ्यात बनवा साबुदाण्याचे कुरकुरीत पापड, सोप्या पद्धतीमध्ये तयार करा पीठ





उन्हाळा सुरु झाल्यानंतर सगळीकडे वाळवणाचे पदार्थ बनवले जातात. त्यात पापड, कुरडया, फेणी इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. जेवणात सोबतीला जर पापड असेल तर चार घास जास्त जातात. याशिवाय अनेकांना रोजच्या जेवणात पापड किंवा कुरडया लागतात. मात्र कुरडया बनवण्यासाठी अधिक वेळ लागत असल्यामुळे अनेक लोक कुरडया बनवणे टाळतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला इडलीच्या भांड्याचा वापर करून साबुदाण्याचे कुरकुरीत पापड बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. साबुदाणा पापड चवीला अतिशय सुंदर लागतात. त्यामुळे तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये पापड बनवू शकता. साबुदाण्यांपासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. याशिवाय साबुदाण्यांपासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात.

साहित्य:

साबुदाणा

मीठ

पाणी

कृती:

साबुदाणा पापड बनवण्यासाठी सर्वप्रथम, साबुदाणे स्वच्छ साफ करून साबुदाणे पाण्यात ६ किंवा ७ तासांसाठी भिजत ठेवा.

टोपात पाणी गरम घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात ७ ते ८ तास भिजत ठेवले साबुदाणे टाकून उकळवून घ्या.

चमच्याने सर्व मिश्रण मिक्स करून घ्या.

साबुदाणे व्यवस्थित शिजल्यानंतर गॅस बंद करून घ्या. इडलीच्या भांड्यात साबुदाण्याचे बॅटर चमच्याने ओतून हाताने हलकासा दाब देत पापड गोलाकार बनवून घ्या.

त्यानंतर इडलीचे भांड गॅसवर ठेवून १० मिनिटं मंद आचेवर पापड वाफवण्यासाठी ठेवा. पापड वाफल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तयार करून घेतलेले पापड हाताने किंवा सुईच्या साहाय्याने काढून प्लस्टिकवर सुकण्यासाठी ठेवा.

पापड उन्हामध्ये कडक सुकवून घ्या. ज्यामुळे पापड लवकर खराब होणार नाहीत.

# तेल लावूनसुद्धा केस गळती थांबतं नाही! मग फॉलो करा नीता अंबानींच्या हेअर स्टायलिस्टने सांगितलेल्या टिप्स






सर्वच महिलांना लांबलचक आणि निरोगी केस हवे असतात. केसांच्या वाढीसाठी महिला सतत काहींना काही करत असतात. कधी केसांना शॅम्पू लावणे तर कधी केसांची गुणवत्ता सुधारण्यासाठी केसांना हेअर मास्क लावला जातो. केसांच्या वाढीसाठी नियमित केसांना तेल लावून हलक्या मसाज करावी. यामुळे केसांची वाढ चांगली होते आणि केस सुंदर आणि चमकदार दिसतात. मात्र चुकीच्या पद्धतीने केसांना तेल लावल्यास केस सतत गळू लागतात. केसांची वाढ होण्याऐवजी केसांची वाढ थांबते. याशिवाय केस गळू लागल्यानंतर अनेक महिला बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या ट्रीटमेंट करून घेतात. मात्र त्याचा फारसा परिणाम केसांवर दिसून येत नाही.

केस सुंदर आणि चमकदार ठेवण्यासाठी आठवड्यातून दोनदा केसांना तेल लावून मसाज करावा. यामुळे केसांमधील रक्तभिसरण सुधारते आणि केस सुंदर दिसू लागतात. टाळूवर वाढलेले इन्फेक्शन कमी करण्यासाठी केसांना तेल लावावे. मात्र केसांना चुकीच्या पद्धतीने तेल लावल्यास केस तुटू लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला नीता अंबानींच्या हेअर स्टायलिस्टने सांगितलेल्या सोप्या टिप्स सांगणार आहोत. या टिप्स फॉलो केल्यास केस सुंदर आणि मऊ होतील. याशिवाय केसांची गुणवत्ता सुधारेल.

केसांच्या निरोगी वाढीसाठी 'या' टिप्स करा फॉलो:

अमित ठाकूर यांनी इंस्टावर पोस्ट शेअर करत केसांची योग्य पद्धतीने कशी काळजी घ्यावी, याबद्दल सविस्तर माहिती सांगितली आहे. केसांना तेल लावून मसाज केल्यानंतर केसांना अनेक फायदे होतात. यामुळे केसांची लांबी वाढते आणि केस मजबूत होतात. कोरड्या केसांपासून सुटका मिळवण्यासाठी नियमित केसांना सूट होईल असे तेल लावावे. यामुळे केसांचे टेक्स्चर सुधारण्यास मदत होते. केसांना तेल लावून मसाज केल्यामुळे केसांना अनेक फायदे होतात पण केस गळती थांबते असे त्यांनी स्पष्टपणे म्हंटलेले नाही.

केस गळतीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केसांना वरून पोषण देण्यासोबतच आतून पोषण देणे सुद्धा तितकेच आवश्यक आहे. यामुळे केसांची वाढ होते आणि केस घनदाट दिसू लागतात. केसांना गरजेपेक्षा जास्त प्रमाणात तेल लावू नये. यामुळे केसांना अतिरिक्त फायदे होत नाहीत. त्यामुळे केसांना पोषण मिळवून देण्यासाठी आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे.


केस गळण्यामागील कारणे:

केस गळण्याची अनेक कारण आहेत. शरीरात होणारे हार्मोन्सचे असंतुलन, चुकीची जीवनशैली, जंक फूडचे अतिसेवन इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम केसांच्या आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे केसांच्या वाढीसाठी शरीराला पचन होईल अशा आणि पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. अतिप्रमाणात केस गळती होण्यास सुरुवात झाल्यानंतर दुर्लक्ष न करता डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे. यामुळे केस गळती थांबते.

# तांदळाच्या पाण्याचे अफलातून उपयोग, आजीच्या बटव्यातील जादू! त्वचा होईल चमकदार, केसही होतील घनदाट

भात खायला कोणाला आवडत नाही, पण तुम्हाला माहिती आहे का की तांदळाचे पाणी त्वचेची आणि केसांची काळजी घेण्यासाठीदेखील वापरले जाऊ शकते. हे शतकानुशतके वापरले जात आहे आणि आमच्या आजी आम्हाला त्याचे फायदे सांगताना कधीही थकल्या नाहीत. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स, अमीनो ॲसिड आणि स्टार्च भरपूर प्रमाणात असते, जे त्वचेची जळजळ कमी करण्यात आणि केसांना बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. तांदळाच्या पाण्यात अनेक गुणधर्म असून त्वचा आणि केसांसाठी नैसर्गिकरित्या उत्तम काम करते. ब्युटिशियन स्मिता कांबळे यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. त्याआधी तांदळाचे पाणी किती उपयुक्त ठरते जाणून घ्या नैसर्गिक त्वचेच्या काळजीसाठी तांदळाचे पाणी एक प्रभावी टोनर म्हणून काम करते, जे छिद्रे घट्ट करण्यास आणि त्वचेचा पोत सुधारण्यास मदत करते. तांदळाच्या पाण्यात कापसाचा गोळा भिजवून तो चेहऱ्यावर लावल्याने त्वचा ताजी आणि चमकदार वाटते. याशिवाय, ते सनबर्न, सूज आणि लालसरपणा कमी करण्यास मदत करते. ज्यांना काळी वर्तुळे आणि सूज येण्याची समस्या आहे त्यांच्यासाठी थंड तांदळाचे पाणी हा एक उत्तम उपाय आहे. थंड तांदळाच्या पाण्यात कापसाचे पॅड भिजवा, ते काही मिनिटे डोळ्यांखाली ठेवा आणि लगेच आराम अनुभवा. स्ट्राँग आणि चमकदार केस त्वचेची काळजी घेण्याव्यतिरिक्त, तांदळाचे पाणी एक उत्तम नैसर्गिक कंडिशनरदेखील आहे. शॅम्पू केल्यानंतर, केस मऊ, चमकदार आणि अधिक व्यवस्थित होण्यासाठी तांदळाच्या पाण्याने स्वच्छ धुवा. हे टाळूला पोषण देते, केसांच्या वाढीस चालना देते आणि केसांच्या कण्या मजबूत करते, ज्यामुळे केस गळणे आणि केस तुटणे कमी होते.

# मधुमेहाचा धोका वाढला! आजपासूनच सुरु करा 'या' ५ रुपयांच्या पदार्थांचे सेवन; मरेपर्यंत कधीही होणार नाही डायबिटीज





सध्याच्या काळात आजारांचे प्रमाण फार झपाट्याने वाढत आहे. यातीलच एक धोकादायक आणि वेगाने वाढणारा आजार म्हणजे डायबिटीज. याचा धोका आजच्या काळात इतका वाढला आहे की मोठेच काय तर लहानांही आजार जडू लागला आहे. याचे मूळ कारण आपली चुकीची जीवनशैली, खाण्या-पाण्यातील बदल आणि व्यायामाचा अभाव असू शकतो. एकदा का तुमच्या रक्तातील साखर अनियंत्रित झाली की मग तीला कंट्रोलमध्ये आणणे खूप कठीण होऊन बसते. अशात आधीपासून काही गोष्टींचे पालन केल्यास या आजरापासून दूर राहता येऊ शकते.

फार पूर्वीपासून नैसर्गिक पदार्थांनी आजारांवर उपचार केले जात आहे. अनेकदा ज्या गोष्टी औषध करू शकत नाहीत ते नैसर्गिक पदार्थ करून दाखवतात. यात कोणतेही रसायन नसल्याकारणाने आरोग्यासाठीही त्यांचे सेवन फायदेशीर ठरते. आज आम्ही तुम्हाला अशाच एका विलक्षण औषधी वनस्पतीविषयी माहिती सांगणार आहोत ज्याच्या नियमित सेवनाने तुम्ही अनेक आजारांना दूर ठेवू शकता. ही वनस्पती म्हणजे कडीपत्ता. रोजच्या आहारात याचा समावेश केल्याने रक्तातील साखर संतुलित राहते, पचनक्रिया सुधारते आणि डायबिटीजचा धोकाही टळतो.

रक्तातील साखर नियंत्रणात राहते

काडिपत्त्याच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित राहते शिवाय यामुळे इन्सुलिनची संवेदनशीलताही सुधारते. कडीपत्त्यामध्ये असलेले फायटोकेमिकल्स आणि अँटी-डायबेटिक गुणधर्म रक्तातील साखर झपाट्याने कमी करते. यामध्ये असणारे पोषक घटक रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. शिवाय याच्या नियमित सेवनाने आपली कार्यक्षमताही सुधारते. दररोज कडीपत्ता चावून खाल्ल्यास किंवा याकग रस रस करून प्यायल्यास टाईप-२ डायबिटीजच्या रुग्णांना फायदा होतो.

वजन नियंत्रणात राहते

काडिपत्त्यामध्ये असे काही गुण असतात जे शरीरातील चरबीचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. यामुळे शरीरातील अनावश्यक चरबी झपाट्याने कमी होते आणि मेटाबॉलिजम वाढू लागते. यामुळे वजन लवकर वाढत नाही. एवढेच काय तर कडीपत्ता शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल दूर करून हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतो. पचनसंस्था सुधारते डायबिटीज असणाऱ्यांना पचनाच्या अनेक समस्या जाणवत असतात. अशात कडीपत्त्याचे सेवन तुमच्यासाठी फायद्याचे ठरू शकते. यामधील नैसर्गिक घटक पचनसंस्थेचे कार्य सुरळीत करण्यास मदत करतात, ज्यामुळे गॅस, ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या कमी होतात. याच्या नियमित सेवनाने यकृताच्या कार्यक्षमतेही वाढ होते. कसे सेवन करावे? आता जर तुम्हाला रोज याचे सेवन कसे करावे असा प्रश्न पडत असेल तर आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही यापासून चविष्ट अशी चटणी बनवू शकता. ही चटणी एकदाच बनवून, तिला साठवून तुम्ही अनेक दिवस याचे सेवन करू शकता. ही चटणी चवीला तर अप्रतिम लागेलच शिवाय ही चटणी तुमच्या आरोग्याचीही पुरेपूर काळजी घेईल. याशिवाय तुम्ही भाजी किंवा डाळ बनवताना तडक्यात कडीपत्त्याचा वापर करू शकता. यामुळे तुमच्या पदाथाची चवही वाढेल.

# नगर पंचायत माहूर ९५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजुर. महापुरुषांचे स्मारके विकसीत करुन, तिर्थक्षेत्राला साजेस शहर बनविणार. – नगराध्यक्ष फिरोज दोसानी...

किनवट: शेख शौकत :–नगर पंचायत माहूर च्या सभागृहात दिनांकः–२८/०२/२०२५ रोजी नगराध्यक्ष श्री.फिरोज कादर दोसानी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी श्री.विवेक भारत कांदे,उपाध्यक्ष श्री.ज्ञानेश्वर नारायण लाड यांच्या व ईतर सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेत सन २०२५–२६ चा रक्कम रुपये ९५,०५,५८,७०२/– एवढया रक्कमेचा व रक्कम रुपये ८,८८,६३७/– रुपयांचा शिल्लकी अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. दिनांकः– २८/०२/२०२५ रोजी नगर पंचायत माहूरच्या सभागृहात अर्थसंकल्पीय विशेष सभा संपन्न झाली. या सभेत सन २०२५–२६ साठीच्या अर्थसंकल्पाचे सविस्तर वाचन लेखापाल वैजनाथ स्वामी यांनी केले. अंदाजपत्रकानुसार नगर पंचायत माहूरला १) दर व करापासुन १,८१,०७,४००/– रुपये, २) विशेष वसुलीतुन ४५,३२,०००/– रुपये, ३) महसुली उत्पन्नातुन ३,८३,९६,३४०/– रुपये, ४) शासनाकडून मिळणा–या अनुदानातुन ७९,७७,७९,५००/– ,५) संकीर्ण वसुलीतुन ८१,४८,४३९/– व ६) दलित वस्ती अनुदान व ईतर यामधुन ८,३६,७४,६००/– व प्रारंभिक शिल्लक ८,०९,०६०/– रुपये



यासह नगर पंचायत माहूरला ९५,१४,४७,३३९/– एवढा निधी अंदाजीत जमा होणे अपेक्षित असल्याची तरतुदी केल्या आहेत. तर नगर पंचायत माहूरने विविध विकास कामासाठी खर्च बाजुला १) सामान्य प्रशासन व वसुली विभागासाठी १,४६,२०,८४५/– , २) सार्वजनिक सुरक्षीतेसाठी ३,०८,४८,५००/–, ३) शहरातील नागरीकांसाठी रस्ते,नाली बांधकामे, सांस्कृतिक सभागृह बांधकामे विविध चौकांचे सुशोभिकरण करणेव ईतर बांधकामे तसेच आरोग्य व सेवा देणेसाठी ७९,२७,३०,४४०/– ४) ग्रंथालय विभागासाठी ७,४२,७३३/– ,५) संकीर्ण कामांसाठी २,९५,२३,२०९/– तसेच ६) दलित वस्ती भागातील सांस्कृतिक सभागृह कामे व ईतर कामांसाठी ८,२०,९२,९७०/– असे एकूण ९५,०५,५८,७०२/– एवढया अपेक्षित खर्च करण्याच्या तरतुदी असलेला व रक्कम रुपये ८,८८,६३७/– एवढया रक्कमेचा शिल्लकी अर्थसंकल्प या सभेत मंजुर करण्यात आला. अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली.या चर्चेत नगराध्यक्ष श्री.फिरोज कादर दोसानी, मुख्याधिकारी श्री.विवेक भारत कांदे, उपाध्यक्ष श्री.ज्ञानेश्वर नारायण लाड, विद्यमान सदस्य तथा माजी नगराध्यक्ष श्री.राजेंद्र नामदेवराव केशवे, सदस्य तथा कॉग्रेस पक्षाचे गटनेते. श्री.विलास बालाजीराव भंडारे, सदस्य तथा शिवसेना पक्षाचे गटनेते श्रीमती.आशाताई निरधारी जाधव,सदस्य भाजपाचे गटनेते श्री.सागर सुधीर महामुने, तसेच सदस्य श्रीमती नंदा रमेश कांबळे,श्री.विजय शामराव कामटकर, श्रीमती.सारीका देविदास सिडाम, श्रीमती शकिलाबी शब्बीर सैय्यद,श्रीमती.लतिफा मस्तान शेख, श्रीमती सागर विक्रम राठोड, श्रीमती बिलकीसबेगम अहमंदअली शेख, श्री.अशोक कचरु खडसे, श्रीमती शीला रणधीर पाटील यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग नोंदविला. या अर्थसंकल्पा मध्ये विशेष प्राधान्याने विविध महापुरुषांच्या स्मारके विकसीत करणे, तिर्थस्थळांना जाणारे रस्ते विकसीत करणे,विकास योजनेतील रस्ते भुसंपादन करुन विकसीत करणे, मोठया नाल्याचे बांधकाम करुन शहरातील पाणी शहराबाहेर काढणे, ओपन स्पेस विकसीत करणे, उद्यान निर्मिती करणे,न.पं.प्रशासकीय इमारत बांधकाम करणे,वाचनालयाचे बांधकाम करणे, असे अनेक विकास कामे करण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. यानंतर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणी चहा–पाना नंतर अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर केले. यावेळी नगर पंचायतचे लेखापाल वैजनाथ स्वामी,लेखापरिक्षक श्री.विशाल मरवाडे,उडढउ विशाल ढोरे, उ.उ.मजहर शेख, सुरेंद्र पांडे, व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

# मटका चालकाकडून पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी सारखणीतील मटका अड्डयावर पोलिसांची धाड

किनवट: शेख शौकत :–सिंदखेड पोलीसांच्या कार्यक्षेत्रातील सारखणी येथिल मटका अड्ड्यावर सिंदखेड पोलिसांनीच धाड टाकून मोटरसायकलसह ६०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांना माहिती दिल्याचा राग मनात ठेऊन पत्रकार रशीद फाजलानींना दोन मटका अड्डा चालकांनी जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार २६ फेब्रुवारी रोजी घडला. सिंदखेड पोलीसात दिलेल्या तक्रारीवरून दोघाजणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मटक्याच्या पट्ट्या घेणाऱ्या तिघांविरुद्ध सिंदखेड पोलिसात गुन्ह्याच्या नोंदी करण्यात आल्याचे सूत्रांकरवी समजते. अवैध गावठी दारु, मटका जुगाराडे, अवैध धंद्यांचे हप्ते वगैरे वगैरेंचा पोलीस प्रशासनावर केलेला आरोप हा फारच जुनाट असून त्यातून त्यांच्यावर कारवाई होऊन धंदे बंद पडतील असेही नाही, म्हणून यात फारशे गांभीर्य नाही. परंतू फारच ओरड झाल्यास अशी थुक्कापॉलीशीची कारवाई करुन अंग झटकल्या जाते. पुन्हा ती धंदे पूर्वपदावर येतांना दिसतात. सारखणी येथे महामार्गालगतच्या शेतामध्ये चालू असलेल्या मटका अड्ड्यावर सिंदखेड पोलीसांनी घाड घालून मटक्याचे साहित्य, ६०० रुपयाची रोखड आणि एक मोटरसायकल जप्त करून महाराष्ट्र जुगार कायदा १२, भारतीय न्याय संहीता कलम ४९ नुसार आरोपी संदेश उत्तम राठोड राजगड, निखिल संतराम पवार सारखणी, शंकर विठ्ठल राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सारखणीतील गुटका, मटका, अवैध दारु, अवैध प्लॉट व्यवसाय, चोरटी , वाळू–मुरुम–गौणखनिजांचे उत्खनन अशा तत्सम व्यवसायाने धुमाकूळ घातल्यामुळे पोलीस, महसूलच्या कृपाछायेखालीच चालतात हे सांगायला नको. त्यांच्या मूकसंमत्ती शिवाय पत्ताही हालू शकत नाही हे सूर्य प्रकाशाएवढे सत्य आहे. पत्रकारांनी वृत्त प्रकाशीत केल्यामुळे प्रशासनाला जबाबदारीतून अंग झटकण्यासाठी एखादी कारवाई करावी लागते. म्हणून पत्रकारांना लक्ष करणे हे गंभीर असल्यामुळेच धमक्याकृत्य करणाऱ्यांच्या मुसक्या आवळायलाच हव्यात असे व्हॉईस ऑफ मीडियाच्या किनवट शाखेच्या पत्रकारांनी म्हंटले आहे.

# प्रा. सतिश कांबळे यांचा मरणोत्तर देहादानाचा संकल्प

लातूर : येथील बौद्ध धम्म चळवळीतील युवक कार्यकर्ते प्रा. सतिश कांबळे यांनी आपल्या जन्मदिनानिमित्त देहदानाचा संकल्प केला आहे, या स्तुत्य निर्णयाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. वाढदिवस म्हटलं की मित्र, पाहुणे, जेवणावळी असा हजारो रुपयांचा वायफळ खर्च ठरलेलाच त्यात आज कालच्या तरुण मुलांमध्ये तर वाढदिवसाचा दिवस म्हणजे रस्त्यावर पाच पन्नास मित्र बोलावून तलवारीने केक कापणे, पुन्हा बार, धाब्यावर पार्ट्या यातून ही पिढी अधोगतीकडे जात असतानाच याच युगात आपल्या आयुष्याचे कांही तरी सार्थ ठरावे असा विचार करणारी युवक मंडळी सुद्धा आहे, सतिश कांबळे यांच्याकडे पाहून असेच म्हणावे लागेल. शहरातील युवा उद्योजक बौद्ध धम्माचे प्रचारक प्रा. सतिश भगवानराव कांबळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्चाला फाटा देत आपण जिवंतपणी कोणाच्या तरी कामाला येऊ शकतो हे सहज आहे, आपले शरीर मरणा नंतरही कामाला यावं ही भावना लक्षात घेऊन आपल्या जन्म दिनी थेट स्व. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गाठून देहदानाची प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी शरीर रचना विभागाचे डॉ. डोपे,भन्ते पय्यानंद थेरो, डॉ. सदानंद कांबळे, सुशिल चिकटे, विजय चौधरी, निलेश बनसोडे, विशाल वाहुळे उपस्थित होते.

# मनपा गाळेधारकांचा व्याजमाफीस उस्फूर्त प्रतिसाद

लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिका मार्फत मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडे वसुलीसाठी दि.२१/०१/२०२५ ते दि. २८/०२/२०२५ पर्यंत मनपा मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील गाळेधारकांना १००% व्याजामध्ये सुट दिलेली होती. सदर सुट ही आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये दिलेली होती. सदर सुट कालावधीमध्ये उपायुक्त, डॉ.पंजाब खानसोळे व मालमत्ता व्यवस्थापक शुभम बावणे व सहा. मालमत्ता व्यवस्थापक पवन सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली गाळे धारकांना १००% व्याजसुटीचा लाभ देऊन गाळे भाडे वसुली करण्याचे आदेश दिलेले होते. त्याअनुषंगाने आज दि. ०१/०३/२०२५ रोजी गांधी मैदान सा.क्रं. ११२ व्यापारी संकुलनामध्ये धडक वसुली मोहिम राबविण्यात आली होती. सदर व्यापारी संकुलनामध्ये आज रोजी चेकव्दारे रक्कम रु ११,०८,१८१/– व नगदी ३,२४,७८५/– असे एकूण १४,३२,९६६/– रु वसुली करण्यात आलेली आहे. तरी या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन ज्या गाळे धारकांकडे



थकबाकी आहे अशा गाळे धारकांनी तात्काळ एकरकमी थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे, तसेच यापूर्वी सिल करण्यात आलेल्या गाळेधारकांना सूचित करण्यात येते की आपल्याकडील थकबाकी भरणा करुन घेण्यात यावी. अन्यथा सदर गाळयांचा ई–लिलाव करण्यात येईल. व ज्या गाळेधारकांकडे थकबाकी आहे असे गाळे मनपा मार्फत सिल करुन सदर गाळयांचा ई–लिलाव ची होणारी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त, डॉ. पंजाब खानसोळे यांनी केलेली आहे.

# आंतरवासिता शिबिरे ही शिक्षकी पेशाची रंगीत तालीम प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचे प्रतिपादन

लातूर : आंतरवासिता शिबिर म्हणजे भावी शिक्षकाला त्याच्या शिक्षकी पेशात प्रवेश करण्यासाठी शालेय वातावरणाशी एकरूप होणारे एक शिबिर असते. हे शिबिर म्हणजे बी.एड.च्या प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी शिक्षकी पेशाची रंगीत तालीम असते, असे प्रतिपादन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. येथील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे आंतरवासिता शिबिर राजमाता जिजामाता विद्यालयात पार पडले. त्यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य केंद्रे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, बी. एड.च्या समन्वयक




अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, डॉ. नाजमीन सय्यद, अरुण करदुरे, आंतरवासिता शिबिराच्या मुख्याध्यापक प्रियंका वाघमारे, पर्यवेक्षक भाग्यश्री आडसकर, लिपिक वर्षा नाईकवाडे, सेवक शुभांगी जोडनाळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुमित जोशी यांनी केले तर आभार राखी मनियार यांनी मानले. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, आंतरवासिता शिबिर कालावधीत मुख्याध्यापकाची भूमिका, शिक्षकाची भूमिका, शाळेत कोणकोणती कामे करावीत, काय काय उपक्रम राबवावेत, शाळेशी संबंधित घटकांशी आंतरक्रिया करणे, शाळेचे दप्तर, विविध नोंदी, मूल्यमापन, शासन व अन्य घटकांशी पत्रव्यवहार अशा सर्व बाबींचा परिचय छात्राध्यापकाला होतो. राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजमध्ये दर्जेदार शिक्षणासोबतच संस्काराचे धडे दिले जातात. या महाविद्यालयातून गुणवंत शिक्षक निर्माण करण्याचे काम होते, असेही त्यांनी सांगितले.

## स्वामी विवेकानंद प्राथमिकच्या विद्यार्थ्यांचा सहलीतून कृषी प्रदर्शनाचा आनंद
## अभिनव उपक्रम : विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणीत करणारा दिशादर्शक प्रयत्न

लातूर दि.०१–०३–२०२५ जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाने शैक्षणिक सहलीचा एक भाग म्हणून अभिषेक मळा कृषी पर्यटन केंद्र, पाकणी जि. सोलापूर येथे विशेष सहलीचे आयोजन केले. यामध्ये २०० विद्यार्थ्यांनी या सहलीमध्ये सहभाग घेऊन कृषी व ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यामुळे हा सहलीचा प्रयोग विद्यार्थ्यांच्या चेहर्यावरील आनंद द्रिगुणीत करणारा ठरलेला आहे.



या सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना शेती, पर्यावरण, ग्रामीण संस्कृती आणि कृषी व्यवसाय यांविषयी माहिती देणे हा होता. निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या सहलीत विद्यार्थ्यांनी हुरडा पार्टी, विविध फळांचे प्रत्यक्ष निरीक्षण, तसेच पारंपरिक ग्रामीण भोजनाचा आस्वाद घेतला. यामुळे त्यांना शेतीशी संबंधित व्यवहारज्ञान मिळाले.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले. रोप–वे, झुले, झुलता पूल, रोप क्लाइम्बिंग, घसरगुंडी, टॉय कार यांसारख्या साहसी खेळांचा आनंद घेताना विद्यार्थी उत्साही दिसत होते. तसेच, डीजे व पारंपरिक बँड पथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. दुपारच्या सत्रात नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. यामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणार्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. ही सहल यशस्वी करण्यासाठी सहल विभाग प्रमुख, शिक्षकवृंद, पालक, एस.टी.बस चालक आणि अभिषेक मळा व्यवस्थापनाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे भविष्यातही अशा शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षणाचा समृध्द अनुभव देण्याचा स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचा संकल्प आहे.

यावेळी या शैक्षणिक सहलीमध्ये शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांसह विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचेराष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर आर्वी येथे मोठ्या उत्साहात संपन्न

लातूर दि.०१–०३–२०२५ लातूर शहराजवळ असलेल्या आर्वी येथील जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालय, लातूर यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे युथ फॉर माय भारत अँड युथ फॉर डिजिटल लिटरसी हे विशेष वार्षिक विशेष शिबीर १५ ते २१ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी ब्रिलियंट महाविद्यालय, लातूरचे प्राचार्य डॉ.युवराज आंधोरीकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.शिवराज बोंडगे, आर्वीचे सरपंच धनंजय देशमुख, प्रा.शिंदे, डॉ.किरण ओटले, प्रा.रोहन देशमुख, प्रा.सूदर्शना चव्हाण, प्रा.आशा डांगे, प्रा.प्रियंका शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरामध्ये बालविवाह प्रतिबंधक उपाययोजना




रॅली आणि डिजिटल साक्षरता या विषयी जनजागृती करण्यात आली. तसेच उपस्थित स्वयंसेवकांच्या विविध कौशल्यावर आधारित आणि एनईपी अभ्यासक्रमाविषयी तसेच तरुणांचे मानसिक आरोग्य शेतकरी आणि सेंद्रीय शेतीविषयी उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली. याबरोबरच उपस्थित विद्यार्थ्यांनी वृक्षारोपनाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम व एकपात्री नाटक सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक रोहन देशमुख यांनी केले. प्रारंभी संयोजन समितीच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.किरण ओटले यांनी केले व आभार प्रा.रोहन देशमुख यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला आर्वी येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मंदिर पुजारी, गावकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्या शुभहस्ते श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयात महाआरती

लातूर दि.०१–०३–२०२५ लातूर शहर व परिसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाचा ७२ वा महाशिवरात्री यात्रा महोत्सव लातूर हा महोत्सव २६ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीत संपन्न होत आहे. यात्रा महोत्सवानिमित्त अनेक कार्यक्रमाची रेलचेल सुरू आहे.



या देवालयाच्या महाआरतीचा मान भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांना मिळाला असून शुक्रवारी सायंकाळी ७.३० वा.त्यांच्या शुभहस्ते महाआरती सपंन्न झाली.

यावेळी श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय संयोजन समितीच्यावतीने माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व इतर मान्यवरांना भगवे वस्त्र, श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाचे विश्वस्त बाबासाहेब कोरे, सुरेश गोजमगुंडे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख, पतंजलि योग समितीचे महाराष्ट्र प्रभारी विष्णूजी भूतडा, माजी नगरसेवक सुभाषअप्पा सुलगुडले, प्रा.डॉ.सतीश यादव, व्यंकटेश हालिंगे, प्रशासकीय अधिकारी, सचिन जांबूतकर, ॲड. शिवलिंगपुरे, शिवराज पानगावे, बाजार समितीचे प्रमुख महादेव बन, महाआरती समितीचे प्रमुख सचिन आलमले, विशाल झांबरे, भोजन समितीचे प्रमुख महादेव खंडागळे, सुप्रभात ग्रुपचे व्यंकटेश अक्कानवरू, सूर्यकांत ओमशेट्टे यांच्यासह श्री.सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानचे भक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE